# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.01.2025** **वारःशनिवार**

---

•सक्षम संरक्षण औद्योगिक परिसंस्थेसाठी आत्मनिर्भरता आणि तांत्रिक सहकार्यावर केंद्र सरकारचा भर असल्याचं राजनाथसिंह यांचं प्रतिपादन
•विकसित भारताचे ध्येय साकारण्यासाठी 2047 पर्यंत देशातील प्रत्येक समस्येवर उपाय काढला जावा – पंतप्रधानांची विशेष मुलाखत
•अमली पदार्थ तस्करी आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयावर आयोजित प्रादेशिक परिषदेचं आज आयोजन
•केंद्राकडून राज्यांना  दीड लाखांहून अधिक कराच्या रकमेचं हस्तांतरण
•राम लल्लाच्या अभिषेक सोहळ्याचा आज तिथीनुसार पहिला वर्धापनदिन, तीन दिवसीय सोहळ्याचं आयोजन
•मलेशियात आज पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात सात्विक-चिराग रेड्डीचा कोरियाच्या जोडीशी सामना

**शाहाअमलीपदार्थ**

केंद्रीय मंत्री अमित शहा आज दिल्लीत अमली पदार्थ तस्करी आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयावर आयोजित प्रादेशिक परिषदेचं अध्यक्षस्थान भूषवणार आहे. अमली पदार्थ नियंत्रण कक्षाच्या वतीनं आयोजित केलेल्या परिषदेत अमली पदार्थांची वाढती चिंता आणि त्याचा राष्ट्रीय सुरक्षेवर होणारा परिणामांना तोंड देणे, विशेषतः उत्तर भारतातल्या आठ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांसंदर्भात लक्ष केंद्रीत केलं जाणार आहे. या परिषदेदरम्यान, अमली पदार्थ विल्हेवाट पंधरवडा मोहिमेचा शुभारंभ अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. तसंच एनसीबीच्या भोपाळ विभागीय केंद्राच्या नव्या कार्यालयाचं उद्घाटन तसंच  सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मानस-२ या हेल्पलाइनचा विस्तार करतील.
येत्या २५ तारखेपर्यंत सुरू राहणाऱ्या अमली पदार्थ विल्हेवाट लावण्याच्या पंधरवड्या मोहिमेदरम्यान, ४४ हजार किलोग्रॅमहून अधिक जप्त केलेले अमली पदार्थ, ज्यांचं आंतरराष्ट्रीय बाजार मूल्य चोवीसशे कोटी रुपये आहे, त्यांची विल्हेवाट लावली जाईल.

**पीएममुलाखत**

विकसित भारताचे ध्येय साकारण्यासाठी 2047 पर्यंत देशातील प्रत्येक समस्येवर उपाय काढला जावा अशी आपली इच्छा आहे, सरकारी योजनांची शंभर टक्के अंमलबजावणी होणं गरजेचं असून ते एका अर्थानं सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षतेचंच एक रूप आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल एका मुलाखतीत सांगितलं. आघाडीचे उद्योजक निखिल कामत यांच्या पॉडकास्टसाठी पंतप्रधानांनी ही मुलाखत दिली. एक माणूस म्हणून माझ्याकडून चुका होऊ शकतात, पण मी वाईट हेतूने कधीही चुका करणार नाही, असंही मोदी यांनी या मुलाखतीत नमूद केलं. राजकारणात यशस्वी होण्यासाठी समर्पण, बांधिलकी, संघभावनेनं काम करणं आणि स्वत: लोकांसाठी कायम उपलब्ध असणं हे गुण
आवश्यक असल्याचंही पंतप्रधानांनी अधोरेखित केला. चांगल्या लोकांनी कायम राजकारणात येत राहिलं पाहिजे, आणि केवळ महत्त्वाकांक्षा न ठेवता ते मिशन मजून काम केलं पाहिजे, असं आपलं मत असल्याचंही,मोदींनी सांगितलं.

**राजनाथसिंह**

सक्षम संरक्षण औद्योगिक परिसंस्था निर्माण करण्यासाठी केंद्र सरकार आत्मनिर्भरता आणि तांत्रिक सहकार्यावर भर देत परिवर्तनकारी धोरणात्मक सुधारणा करत आहे,असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं. ते काल नवी दिल्लीत विविध देशांच्या राजदूतांच्या गोलमेज परिषदेत बोलत होते. पुढील महिन्यात बेंगळुरू इथं होणाऱ्या 'एरो इंडिया २०२५' या आशियातील सर्वात भव्य हवाई प्रदर्शनाच्या पार्श्वभूमीवर काल  या बैठकीचं  आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी राजनाथ सिंह यांनी संरक्षण आणि एरोस्पेस क्षेत्रातील देशाच्या प्रगतीवर प्रकाश टाकला.

**ओमबिर्लाराष्ट्रकुल**

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी काल ग्वेर्नसी इथं  झालेल्या राष्ट्रकुल राष्ट्रांच्या सभापती आणि पीठासीन अधिकाऱ्यांच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भुषवले. या बैठकीत, बोलताना त्यांनी भारतामध्ये, शेती, अर्थतंत्र आणि कृत्रिम बुद्धीमत्ता यांसह विविध क्षेत्रात होत असलेल्या परिवर्तनाविषयी माहिती दिली. हवामान बदल, दहशतवाद आणि सायबर गुन्हेगारी सारख्या वैश्विक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संसद अधिक प्रभावी, सर्वसमावेश आणि पारदर्शक करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं. तसंच सुशासन आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी संसदीय संस्था अधिक प्रभावी, सर्वसमावेश आणि पारदर्शक करण्याच्या महत्त्व

असल्याचं सांगितलं. सरकारच्या धोरणं निर्मिती, संसाधनांचं न्याय वाटप तसंच निष्पक्ष आणि शाश्वत भविष्य घडवण्यासाठी, संसद सदस्यांची भूमिका मार्गदर्शक असली पाहिजे यावरही त्यांनी भर दिला.

**मोदीफ्रान्सदौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी फ्रान्सच्या दौऱ्यावर जाणार आहेत,असं फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी काल जाहीर केलं. या शिखर परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेवर अर्थपूर्ण चर्चा करण्यात येणार असून सर्व प्रमुख जागतिक शक्तींमध्ये परस्पर संवादासाठी या परिषदेत एक व्यासपीठ उपलब्ध करून दिलं जाईल,असंही इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी सांगितलं.

**राष्ट्रपती**

प्रवासी भारतीय समुदाय जगासमोर भारताचं खरं चित्र मांडत असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. ओडिशातील भुवनेश्वर येथे आयोजित 18 व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचा समारोप करताना त्या काल बोलत होत्या. परदेशातील भारतीय समुदाय औषध आणि तंत्रज्ञानासह सर्व क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करत आहे, प्रवासी भारतीयांकडे केवळ ज्ञान आणि कौशल्यच नाही तर ते आपल्या मूल्यांचीही जोपासना करत आहेत, असे कौतुकोद्गारही राष्ट्रपती मुर्मू यांनी काढले. या समारोप समारंभात राष्ट्रपतींच्या हस्ते विविध क्षेत्रात आपल्या
कर्तृत्वानं परदेशात ठसा उमटविणाऱ्या २७ प्रवासी भारतीयांना प्रवासी भारतीय सन्मान प्रदान करण्यात आले.

**योगीपंप्र**

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काल दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. पंतप्रधानांचे मार्गदर्शन आणि प्रेरणेमुळे प्रयागराज इथं संपन्न होत असलेला महाकुंभ मेळा शाश्वत अभिमानाचे प्रतीक ठरेल असं योगी यांनी भेटीनंतर लिहिलेल्या समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. यामधून नव्या भारताचे भव्य, दिव्य आणि डिजीटल स्वरुप दिसेल असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. प्रयागराज इथं १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी कालावधीत होतो आहे.

**करहस्तांतरण**

केंद्र सरकारकडून राज्यांना काल डिसेंबर २०२४ साठी एक लाख ७३ हजार ३० कोटी रुपयांच्या करांच्या रकमेचं हस्तांतरण करण्यात आलं. यामध्ये महाराष्ट्राच्या १० हजार ९३० कोटी ३१ लाख रुपयांचा वाटा आहे. राज्यांना भांडवली खर्चाला गती देता यावी तसंच विकासकामं आणि कल्याणकारी उपक्रमांना वित्त पुरवठा
करणं शक्य व्हावं , यासाठी हा निधी जारी करण्यात आला असल्याचं वित्त मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे याबद्दल आभार मानले आहेत. राज्याच्या विकासाला चालना देण्याच्या प्रयत्नांना यामुळं पाठबळ मिळणार असल्याचं फडणवीस यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**इस्रोडॉकिंग**

इस्रोच्या महत्त्वकांक्षी अवकाश डॉकिंग योजनेची नवीन तारीख लवकरच निश्चित केली जाईल अशी माहिती इस्रोचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी काल दिली. दोन्ही उपग्रह सुरक्षित असल्याचंही त्यांनी आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत सांगितलं. सोमनाथ यांनी, नॅव्हिक हे इस्रोचं शंभरावं उपग्रह प्रक्षेपण असून जानेवारीच्या अखेरीस प्रक्षेपण होणार असल्याची माहिती या मुलाखतीत दिली.

**ट्रम्पबिनशर्त**

अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना हश मनी प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रकरणी त्यांनी बिनशर्त मुक्तता करण्यात आली आहे. या प्रकरणी, न्यूयॉर्क न्यायालयानं ट्रम्प यांना कोणत्याही शिक्षेशिवाय दोषी ठरवलं आहे. याचा अर्थ ट्रम्प तुरुंगवास, दंड होणार नाही. या निर्णयामुळे ट्रम्प यांच्या शपथविधीचा मार्ग मोकळा झाला आहे. एखाद्या प्रकरणात दोषी ठरवल्यानंतरही राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेणारे ट्रम्प हे अमेरिकेचे पहिलेच अध्यक्ष ठरणार आहेत.

**दिल्लीभाजप**

दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीची अधिसूचना काल जारी झाल्याच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. राजधानीतल्या ७० जागांसाठी येत्या १७ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. या निवडणुकीसाठी उमेदवारांची नावे अंतिम करण्यासाठी भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक काल संध्याकाळी दिल्ली पार पडली. या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप अध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह तसंच अन्य महत्त्वाचे पक्षनेते उपस्थित होते.

**अयोध्या**

अयोध्येतल्या भव्य राम मंदिरात राम लल्लाच्या अभिषेक सोहळ्याचा आज वर्धापनदिन आहे. त्यानिमित्तानं तीन दिवसांचा भव्य उत्सव आजपासून सुरू होणार आहे. गेल्या वर्षी २२ जानेवारी रोजी पंतप्रधानांच्या हस्ते श्रीराम जन्मभूमि मंदिराचं उद्घाटन झालं होतं, मात्र, पौष शुद्ध द्वादशी या तिथीनुसार आज प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा वर्धापनदिन साजरा केला जाणार आहे. तीन दिवसांत विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार आहे.

**जावेदअख्तर**

मुंबईत आयोजित २१ व्या थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सवाला काल प्रारंभ झाला. यावेळी ज्येष्ठ पटकथा लेखक आणि गीतकार पद्मभूषण जावेद अख्तर यांना चित्रपट क्षेत्रातल्या भरीव योगदानाबद्दल 'एशियन कल्चर' या विशेष पुरस्कारानं महोत्सवाचे अध्यक्ष किरण शांताराम यांच्या हस्ते गौरवण्यात आलं. या महोत्सवाचं हे २१ वर्ष असून, आशियाई देशांतले विविध चित्रपट इथं पहायला मिळतील. 'ब्लॅक डॉग' चित्रपटानं यंदाच्या महोत्सवाला प्रारंभ झाला.

**<u>हॉकीसाखळी</u>**

राऊरकेलामध्ये सुरू असलेल्या भारतीय हॉकी साखळी सामन्यांत काल तामिळनाडू ड्रॅगन्सनं शार्ची राढ बेंगाल टायगर्सला 2-1 ने नमवलं. या विजयामुळे गुणतालिकेत तामिळनाडूचा संघ सर्वोच्च स्थानी आला आहे. आज, हैदराबाद तुफान संघाचा सामना सूरमा हॉकी क्लबशी होणार आहे. तर दुसरा सामना दिल्ली एसजी पायपर्स आणि युपी रुद्राज बरोबर होणार आहे.

**<u>फूटबॉल</u>**

भारतीय साखळी फुटबॉल सामन्यांमध्ये काल रात्री पंजाब एफसी आणि नॉर्थ इस्ट युनायटेड एफसी यांच्यातला सामना अनिर्णित अवस्थेत संपला. आज मोहन बागान विरूद्ध ईस्ट बेंगाल आणि बंगळुरू एफसी विरूद्ध मोहम्मेदन एससी यांच्यात संध्याकाळी सामने होणार आहेत.

**<u>मलेशियाखुलीबॅडमिंटन</u>**

मलेशियात सुपर थाउजंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, पुरूषांच्या दुहेरीच्या उपांत्य फेरीत सात्विकसाईराज रेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीचा सामना आज कोरियाच्या जोडीशी होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी हा सामना होणार आहे. तत्पुर्वी उपउपांत्य फेरीत या जोडीनं मलेशियाच्या जोडीचा २६-२४, २१-१५ असा सरळ सेटमध्ये पराभव केला.

**<u>महिलाक्रिकेट</u>**

राजकोट इथं झालेल्या महिलांच्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारतीय संघानं आयर्लंडच्या संघावर सहा गडी राखून विजय मिळवला. आर्यलंडने विजयासाठी दिलेलं २३९ धावांचं लक्ष्य भारतानं प्रतिका रावल आणि तेजल हसबनीस या खेळाडूंच्या उत्तम कामगिरीच्या जोरावर फक्त ३४ षटकं चार चेंडूतच पार केलं. मालिकेतला दुसरा सामना उद्या होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.